* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

**प्रेस नोट**

दि.११/०३/२०१९

---

## लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वाशिम पोलीस दल सज्ज कारवायांचा धडाका.

मा. पोलीस अधिक्षक श्री.वसंत परदेशी यांनी पोलीस अधिक्षक पदाचा स्विकारताच कारवायांचा धडाका सुरु करुन आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुका २०१९ मध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी संपुर्ण जिल्हयामध्ये विशेष मोहिम हाती घेतली. त्याचाच एक भाग म्हणुन दिनांक १०/०३/२०१९ ते ११/०३/२०१९ चे रात्री दरम्यान ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात आले. सदर ऑलआऊट ऑपरेशन मध्ये १६ अधिकारी ११० पोलीस कर्मचारी सहभागी झाले. सदर ऑपरेशन मध्ये ३२ निगराणी बदमाश चेक करण्यात आले, ४ अटक वॉरंट मधील आरोपी अटक करण्यात आले. तसेच नाकाबंदी दरम्यान ३०३ वाहने चेक करण्यात आली.

मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ऑल आऊट ऑपरेशन,नाकाबंदी अशाप्रकारच्या मोहिम दररोज राबविण्यात येणार आहेत. तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपणास काही आक्षेपाहर्य आढळल्यास त्याबाबत आपण निसंकोच पणे नियंत्रण कक्ष वाशिम येथे माहिती कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम